# देवाने आम्हावर सोपवून दिलेल्या सर्व गोष्टींचे आम्ही योसेफा प्रमाणे कारभारी आहोत

मुलांना शिकवणाऱ्यांनी S3b हा अभ्यासक्रम वाचावा

**प्रार्थना:** ''देव पित्या सर्व काही तुझे आहे आणि आमच्याकडे आहे ते सर्व तूच दिलेले आहेस कृपा करून आमच्याकडे जे आहे त्या सर्व गोष्टींची काळजी घेण्यास आणि प्रत्येक गोष्टीत तुला मान देण्यास आम्हांला शक्ती पुरव आमेन''

**1. प्रार्थना आणि देवाचे वचन ह्या द्वारे तुम्ही स्वतःची तयारी करा.**

अगदी आरंभापासून आत्तापर्यन्त देव त्याने निर्माण केलेल्या त्याच्या गोष्टी लोकांच्या हवाली करीत आहे.

**उत्पत्ती 1:26-28** ह्या वचनांत लोकांनी पृथ्वीवर कसे राज्य केले ते पाहा. प्रश्नांची उत्तरे खाली दिली आहेत पण ती पाहण्यापूर्वी शास्त्रपाठातून उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करा.




अ) आपल्या जमीनीची व्यवस्था पाहण्याचा अधिकार लोकांना कोणाकडून मिळतो!

ब) आपल्या गुराढोरांची देखभाल करण्याचा अधिकार लोकांना कोणाकडून मिळतो?

क) जमीन व गुरेढोरे ह्या गोष्टीची व्यवस्था कशा प्रकारे ठेवली याचा हिशेब लोक कोणाला देतील?

*(उत्तरे: अ) देवाकडून, ब) देवाकडून, क) देवाला)*

**उत्पत्ती 39:2-5** ह्या वचनात योसेफ मिसरी माणसाच्या मालमत्तेचा कारभारी कसा झाला ते पहा



अ) आम्ही इतरांसाठी त्यांच्या कामाची व्यवस्था पाहतो तेव्हा देवाची आमच्याकडून काय अपेक्षा असते?

ब) आम्ही लोकांच्या कामाची व्यवस्था उत्तम ठेवली तर लोकांना आमच्या बद्दल काय वाटेल?

(उत्तरे: अ) त्यांच्या मालमत्तेची योग्य प्रकारे काळजी घेऊन त्यांना आशीर्वादित करावे. ब) ते आमच्यावर विश्वास ठेवतील.)

**लूक 12:42-48** ह्या वचनांत आमच्या मालमत्तेची व्यवस्था आम्ही कशा प्रकारे ठेवली पाहिजे याबद्दल येशू सांगतो ते पाहा.

- येशू परत येईल तो इमानी कारभाऱ्याला कशा प्रकारे बक्षीस देईल? *(उत्तर: वचने 42-44)*
- येशूचे आपल्या मालमत्तेच्या संबंधात आज्ञापालन न करणाऱ्यांशी तो कसा वागेल? *(उत्तर: वचने 45-47)*
- येशू ज्यांच्याकडे अधिक मालमत्ता आहे त्यांच्याकडून कशाची अपेक्षा करतो? *(उत्तर: वचन 48)*

**1 करिंथ 4:1-4** ह्या वचनांत देव त्याच्या सत्याचे कारभारीपण करणाऱ्यां बद्दल काय म्हणतो ते पाहा.

- आम्हा कारभाऱ्यांकडून देवाची काय अपेक्षा आहे? *(उत्तर: आम्ही विश्वासू असले पाहिजे)*
- आमची परीक्षा घेणारे कारभारी कोण आहेत? *(उत्तर: इतर, न्यायालये आणि स्वत: प्रभु)*

**1 थेस्सल 4:1-8** ह्या वचनांत आमच्या शरीरांचा उपयोग आम्ही कशा प्रकारे केला पाहिजे हे सांगितले आहे ते पाहा.

- आमच्या शरीरांवर कोणाचा अधिकार आहे? *(उत्तर: वचने 1 व 2)*
- या पृथ्वीवरील जीवनात आम्ही आमची शरीरे कशा प्रकारे उपयोगात आणली पाहिजेत? *(उत्तर: वचने 3-5)*
- आमच्या शरीरांचा वापर करून आम्ही इतरांची फसवणूक केली तर प्रभु काय करील? *(उत्तर: वचन 6)*
- आमच्या शरीरांची आम्हांला योग्य व्यवस्था राखता यावी याकरीता देव आम्हांला काय देतो? *(उत्तर: वचने 7 व 8)*

**1 पेम 4:10-11** ह्या वचनांत तुमच्या आध्यात्मिक दानांचा कसा उपयोग केला पाहिजे हे सांगितले आहे ते पाहा

- आमच्यापैकी कोणाला देवाकडून अध्यात्मिक दान मिळाले आहे? *(उत्तर: आमच्यापैकी प्रत्येकाला)*
- दोन प्रकारच्या आध्यात्मिक दानांचे उपयोग काय आहेत? *(उत्तर: देवासाठी बोलणे, देवासाठी सेवा करणे)*
- आमच्या आध्यात्मिक दानांचा उपयोग करण्यासाठी आम्हांला सामर्थ्य कोणाकडून मिळते? *(देवाकडून)*
- आम्ही आमच्या आध्यात्मिक दानाचा उपयोग करतो तेव्हा कोणाचे गौरव व्हायला पाहिजे? *(येशू ख्रिस्ताचे)*

**2. तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून आठवडाभरात करावयाच्या कामांची योजना करा.**

एकत्रित बसून चर्चा करा आणि तुम्ही व ते पुढील गोष्टींचा उपयोग कसा करीत आहात ते पाहा 1) तुमची मालमत्ता, 2) इतरांची मालमत्ता, 3) देवाचे सत्य 4) तुमची शरीरे आणि 5) तुमची आध्यात्मिक दाने.

ह्या गोष्टींचा उपयोग ते अधिक चांगल्या प्रकारे कसा करतात ते प्रत्येकाला सांगू द्या.

एकत्रित प्रार्थना करून, ह्या सर्व गोष्टींचा अधिक विश्वासूपणे उपयोग करण्यास सहाय्य भाग.

अधिक चांगले कारभारी होण्याची गरज असणाऱ्या विश्वासणाऱ्यांची भेटघ्या.

- वर दिलेली पवित्र शास्त्रातील वचने वाचा.
- विश्वासणाऱ्यांनी प्रामाणिक असावे यासाठी देवाने सहाय्य करावे याकरीता प्रार्थना करा.

**3. तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या उपासना सभेसाठी योजना करा.**

पवित्र शास्त्रातील कारभारीपणा विषयी सांगणारे उतारे वाचून त्यांचे स्पष्टीकरण करा, काही उताऱ्यांचा उल्लेख वर केला आहे.

कारभारीपणा विषयीच्या पुढील सत्यांचे स्पष्टीकरण करा.

- देव प्रत्येक उत्तम गोष्टीचा निर्माणकर्ता व मालक आहे.
- देव प्रत्येक व्यक्तीवर अनेक गोष्टी सोपवतो. (जीवन, शरीर,जमीन, प्राणी, मालमत्ता, नोकरी,जोडीदार, मुले, ज्ञान, पैसा, पवित्र शास्त्र आध्यात्मिक दाने इत्यादी)
- देव आम्हांला अभिवचने देतो आणि तो आमच्याशी पूर्णपणे विश्वासू असतो.
- देव आमच्यावर सोपवून देतो त्या सर्व गोष्टीशी आम्ही प्रामाणिक असावे यासाठी आमचे सहाय्य करण्याची त्याची इच्छा आहे.
- देव प्रत्येकजण किती विश्वासू आहे याचा न्याय करणार आहे.
- देव आपल्या शरीराने इतरांची फसवणूक करणाऱ्या प्रत्येक विश्वासणाऱ्याला शिक्षा देणार आहे.
- देव त्याने सोपवून दिलेल्या गोष्टींशी विश्वासू राहणाऱ्यांना प्रतिफळ देणार आहे.

अधिक चांगले कारभारी होण्यासाठी देव तुमचे कशा प्रकारे सहाय्य करतो हे सांगा,

अधिक चांगले कारभारी होण्यासाठी देव विश्वासणाऱ्यांना कशा प्रकारे सहाय्य करीत आहे हे सांगण्यासाठी त्यांना आमंत्रित करा, त्यांचे म्हणणे पूर्णपणे ऐकून घ्या त्यांच्या बोलण्यात पुढील मुद्दे नसतील तर तुम्हांला ते सांगता येतील.

## देवाचे कारभारी ह्या नात्याने त्याने आमच्यावर सोपवलेल्या गोष्टी

आमची **शरीरे** त्यांचे आम्ही पोषण, संरक्षण करून ती पवित्र राखली पाहिजेत.

आमची **जमीन** तिचा आम्ही उपयोग करून तिचा धूप होण्यापासून बचाव केला पाहिजे.

आमचे **प्राणी** त्यांचा आम्ही शेतीसाठी उपयोग करून त्यांच्याशी माणुसकीच्या हष्टीकोनातून वागले पाहिजे.

आमच्या **पैशाने** आमच्या गरजा तसेच इतरांच्या गरजाही पूर्ण होतात.

आमच्या **मुलांचे** आम्ही पालनपोषण करून त्यांची काळजी घेऊन त्यांना सुवार्ता सांगितली पाहिजे.

आमचे **आई-वडील** त्यांचा आम्ही आदर करून त्यांची काळजी घेतली पाहिजे.

आमचे **घर व मालमत्ता** हे आम्ही गरजेनुसार वाटून घेतले पाहिजे.

आमची **आध्यात्मिक** दाने यांच्याद्वारे आम्ही एकमेकांची सेवा केली पाहिजे.

आमचे **ज्ञान** आम्ही त्याची गरज असणाऱ्यांना दिले पाहिजे.

आमचा **येशूवरील वि श्वास** आम्ही दररोज प्रत्यक्षात आचरणात आणला पाहिजे.

आणखी इतर काही मुद्दे तुम्हांला सांगता येतील का?

मुलांना त्यांनी तयार केलेली नाटिका सादर करण्यास व प्रश्न विचारण्यास सांगा.

प्रभु भोजनाची ओळख्व करून देण्यासाठी, 2 इतिहास 35:15-19 हा शास्त्रभाग वाचा स्पष्ट करून सांगा की देवाच्या लोकांनी परमेश्वराच्या वल्हांडण सणाकडे दुर्लक्ष केले होते त्यांना योशीया राजाने तो साजरा करावयास लावला हा राजा चांगला होता प्रभुभोजन म्हणजे ख्रिस्ती लोकांची वल्हांडणाची मेजवानी होय.

एकत्रितपणे पाठ करा 1 करिंथ 14:2, ''कारभारी म्हटला की, तो विश्वासू असला पाहिजे.''

विश्वासणारे व पाहुणे ह्यांचे दोन किंवा तीन लहान लहान गट करा. त्यांना त्यांच्या गरजा सांगू द्या, चांगला कारभारी होण्यासाठीचा त्यांचा हेतू व्यक्त करू द्या आणि एकमेकांसाठी प्रार्थना करा.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net